महाराष्ट्र पोलीस
सद्रक्षणाय खलनिग्रहणाय

# पोलीस उप आयुक्त वाहतुक विभाग, ठाणे शहर

तीन हात नाका, एल.बी.एस.मार्ग, नौपाडा, ठाणे (पश्चिम)
दुरध्वनी क्रमांक – ०२२–२५४०१०५६
Email ID – cp.thane.dcptraffic@mahapolice.gov.in

स्वातंत्र्याचा अमृत महोत्सव

जा.क्र. पोउपआ/वावि/अधिसुचना/ 39 /२०२२ दि. १४/०४/२०२२

## ''वाहतुक नियंत्रण अधिसुचना''

**ज्याअर्थी,** ठाणे महानगरपालिका, ठाणे कार्यक्षेत्रात कासारवडवली वाहतूक उपविभागाचे हद्दीत मे. जे. कुमार इन्फ्राप्रोजेक्ट लि. या कंपनी कडून मुंबई मेट्रो लाईन–४ चे कासारवडवली ते गायमुख पर्यत काम चालू आहे. सदर मेट्रो – ४ चे पिलरवर विहंग हिल्स सोसायटी ते नागला बंदर, घोडबंदर रोड, ठाणे या ठिकाणी गर्डर टाकण्याचे काम करण्यात येणार आहे.

**ज्याअर्थी,** पिलर क्र. ६१ ते ६८ व पिलर क्रमांक ०५ ते ०६ चे काम विहंग हिल्स सोसायटी ते नागला बंदर, घोडबंदर रोड, व पिलर क्र. ०३ ते ०४, ३६ ते ३७ चे काम रात्रौ २३:५५ ते पहाटे ०४:०० वाजेपावेतो वेदांत हॉस्पीटल घोडबंदर रोड ठाणे या ठिकाणी गर्डर टाकण्याचे काम करण्यात येणार आहे. त्यावेळी ठाणे कडून घोडबंदर रोड वाहिनी वाहतुकीस बंद करण्यात येणार असल्याने, सदर परिसरात वाहतुकीची कोंडी होऊ नये व परिसरातील वाहतूक मुरळीत व सुनिश्चित होण्याकरीता आम जनतेच्या सोईसाठी,

**त्याअर्थी,** मी, बाळासाहेब पाटील, पोलीस उप आयुक्त, वाहतूक विभाग, ठाणे शहर म्हणून, मला महाराष्ट्र शासन गृहविभाग क्र. एम.व्ही.ए.–११६/सीआर/३७/टीआर, दि. २७/०९/१९९६ चे अधिसूचनेनुसार मोटार वाहन कायदा कलम ११५, ११६ (१) (अ) (ब) अन्वये प्राप्त झालेल्या अधिकाराचा वापर करून पुढील प्रमाणे अधिसूचना जारी करीत आहे :–

**प्रवेश बंद –** १) मुंबई–नाशिक महामार्गाने घोडबंदर रोडच्या दिशेने जाणा–या अवजड वाहनांना तत्वज्ञान विद्यापीठ, कापूरबावडी जंक्शन येथे **''प्रवेश बंद''** करण्यात येत आहे.

**पर्यायी मार्ग –** अ) मुंबई–नाशिक महामार्गाने घोडबंदर रोडच्या दिशेने जाणारी जड अवजड वाहने कापूरबावडी सर्कल येथून उजवे वळण घेवून बाळकुम नाका, भिवंडी आग्रा रोड, कशेळी, काल्हेर, अंजुरफाटा, भिवंडी मार्गे इच्छित स्थळी जातील.

ब) तसेच इतर हलकी वाहने ही **पिलर क्रमांक ६१ ते ६८ वर गर्डर टाकणेचे वेळी विहंग हिल्स सोसायटी येथुन डावीकडे वळण घेवुन सर्व्हिस रोडने नागला बंदर येथे उजवीकडे वळण घेवुन घोडबंदर रोड मार्गे इच्छित स्थळी** जातील.

क) तसेच इतर हलकी वाहने ही पिलर क्रमांक ०३ते ०४ व ३६ ते ३७ वर गर्डर टाकणेचे वेळी एच. पी. पेट्रोल पंप कासारवडवली बस स्टॉप **येथुन डावीकडे वळण घेवुन सर्व्हिस रोडने** ओवळा सिग्नल **येथे उजवीकडे वळण घेवुन घोडबंदर रोड मार्गे इच्छित स्थळी** जातील.

**प्रवेश बंद –** २) मुंबई कडून कापूरबावडी जंक्शन, तत्वज्ञान विद्यापीठ मार्गे घोडबंदर रोडकडे जाणाऱ्या सर्व जड, अवजड वाहनांना **माजीवाडा गोल्डन डाईज** ब्रिज वर वाय जंक्शन येथे **'प्रवेश बंद'** करण्यात येत आहे.

**पर्यायी मार्ग –** सदरची जड अवजड वाहने नाशिक रोडने खारेगांव टोलनाका, मानकोली नाका, अंजुर फाटा मार्गे इच्छित स्थळी जातील.

सदरची वाहतूक अधिसूचना ही खालील नमूद कालावधी दरम्यान गर्डर टाकण्याचे काम पूर्ण होई पर्यत अंमलात राहील.

१) दि. १४/०४/२०२२ रोजी रात्रौ २३.५५ वा. ते दि. १५/०४/२०२२ रोजी सकाळी ०४.०० वाजे पर्यत
२) दि. १५/०४/२०२२ रोजी रात्रौ २३.५५ वा. ते दि. १६/०४/२०२२ रोजी सकाळी ०४.०० वाजे पर्यत
३) दि. १७/०४/२०२२ रोजी रात्रौ २३.५५ वा. ते दि. १८/०४/२०२२ रोजी सकाळी ०४.०० वाजे पर्यत
४) दि. १९/०४/२०२२ रोजी रात्रौ २३.५५ वा. ते दि. २०/०४/२०२२ रोजी सकाळी ०४.०० वाजे पर्यत
५) दि. २१/०४/२०२२ रोजी रात्रौ २३.५५ वा. ते दि. २२/०४/२०२२ रोजी सकाळी ०४.०० वाजे पर्यत
६) दि. २३/०४/२०२२ रोजी रात्रौ २३.५५ वा. ते दि. २४/०४/२०२२ रोजी सकाळी ०४.०० वाजे पर्यत
७) दि. २४/०४/२०२२ रोजी रात्रौ २३.५५ वा. ते दि. २५/०४/२०२२ रोजी सकाळी ०४.०० वाजे पर्यत
८) दि. २६/०४/२०२२ रोजी रात्रौ २३.५५ वा. ते दि. २७/०४/२०२२ रोजी सकाळी ०४.०० वाजे पर्यत
९) दि. २८/०४/२०२२ रोजी रात्रौ २३.५५ वा. ते दि. २९/०४/२०२२ रोजी सकाळी ०४.०० वाजे पर्यत

सदरची वाहतूक नियंत्रण अधिसूचना ही पोलीस वाहने, फायर ब्रिगेड, रुग्णवाहिका, ग्रीन कॉरीडोर, ऑक्सीजन गॅस वाहने व इतर अत्यावश्यक सेवेतील वाहनांना लागू राहणार नाही.

**( बाळासाहेब पाटील )**
पोलीस उप आयुक्त,
वाहतूक विभाग, ठाणे शहर.

Scanned with CamScanner

प्रति,

जिल्हा माहिती अधिकारी, जिल्हा माहिती अधिकारी कार्यालय, ठाणे.

२/– सदरची अधिसुचना प्रसिध्द करण्यास विनंती आहे.

<u>प्रत माहितीसाठी सादर</u>

मा. पोलीस आयुक्त, ठाणे शहर

मा. पोलीस सह आयुक्त, ठाणे शहर

मा. अपर पोलीस आयुक्त, पश्चिम प्रादेशिक विभाग, ठाणे शहर

मा. जिल्हाधिकारी,ठाणे.

मा. आयुक्त, ठाणे महानगरपालिका,ठाणे.

मा. पोलीस उप आयुक्त, परिमंडळ–५ वागळे इस्टेट व विशेष शाखा,ठाणे.

<u>प्रत कार्यवाहीसाठी</u> :–

प्रादेशिक परिवहन अधिकारी ठाणे.

परिवहन व्यवस्थापक,ठाणे महानगरपालिका,ठाणे,

नियंत्रण कक्ष अधिकारी, ठाणे

विभाग नियंत्रक,महाराष्ट्र राज्य परिवहन, ठाणे

प्रत:– <u>पोलीस उप आयुक्त, आर्थिक गुन्हे,ठाणे शहर</u>

२/– सदरची अधिसुचना नागरीकांच्या माहितीसाठी ठाणे शहर पोलीस वेबसाईटवर प्रसिध्दी होणेस विनंती आहे.

प्रत :– <u>समन्वय अधिकारी, ९ ए.एस.कक्ष,ठाणे</u>

२/– सदरची अधिसुचना पोलीस नोटीसमध्ये प्रसिध्दीसाठी.

प्रत :– <u>सपोआ वाहतूक विभाग, ठाणे, वागळे व प्रभारी अधिकारी, कापुबावडी, कळवा, नारपोली, वागळे, वाहतूक उपविभाग.</u>

२/– म.न.पा.ठाणे च्या संबंधीत अधिकाऱ्यांकडून आवश्यक सुचना फलक लावून घ्यावीत.

Scanned with CamScanner